18-19 (20)

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION


# RESEARCH JOURNEY

INTERNATIONAL E-RESEARCH JOURNAL

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February - 2019 Special Issue- 111 (B)

# साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर



अतिथी संपादक :

**डॉ. व्ही.बी. गायकवाड**

प्राचार्य

मराठा विद्याप्रसारक समाजाचे

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

विशेषांक संपादक :

**डॉ. दिलीप पी. पवार**

विभाग प्रमुख व समन्वयक, मराठी संशोधन केंद्र

मराठा विद्याप्रसारक समाजाचे

के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

मुख्य संपादक :

**डॉ. धनराज धनगर (येवला)**

This Journal is indexed in :

- UGC Approved Journal
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- Global Impact Factor (GIF)
- International Impact Factor Services (IIFS)
- Indian Citation Index (ICI)
- Dictionary of Research Journal Index (DRJI)

SWATIDHAN PUBLICATIONS

ISSN :
2348-7143
January-2019

mpact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

PEER REFREED & INDEXED JOURNAL

February-2019 Special Issue – 111 (B)

## साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर

अतिथी संपादक
डॉ. व्ही. बी. गायकवाड
प्राचार्य,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

विशेषांक संपादक
डॉ. दिलीप पी. पवार
विभाग प्रमुख व समन्वयक, मराठी संशोधन केंद्र,
के.टी.एच.एम. महाविद्यालय, नाशिक

मुख्य संपादक
डॉ. धनराज धनगर (येवला)

SWATIDHAN INTERNATIONAL PUBLICATIONS
For Details Visit To : www.researchjourney.net

© All rights reserved with the authors & publisher Price : Rs. 800/-



urnal ISSN :
(2013) 2348-7143
यमांतर January-201
urnal

| | |
|---|---|
| /लेखिका | पृ.क्र. |
| रीष लांडगे | 05 |
| ाराम रोंगटे | 09 |
| दश्री थिगळे | 14 |
| प पी.पवार | 21 |
| र बोऱ्हाडे | 30 |
| ुरेश जाधव | 33 |
| ामदिनवार | 36 |
| ीमा बोडके | 41 |
| व खालकर | 44 |
| ोक लिंबेकर | 50 |
| ाम चौधरी | 53 |
| ण पाटील | 64 |
| ता जाधव | 69 |
| रण पिंगळे | 73 |
| ली आचार्य | 77 |
| छाया शिंदे | 82 |
| कि नांगरे | 86 |
| तेभा घाग | 89 |
| ल.भुसारे | 92 |
| जेंद्र ठाकरे | 95 |
| ार भोसले | 105 |
| ती निकम | 109 |
| दत्त गवरे | 113 |
| ा मोहिते | 116 |
| ोक भवर | 120 |
| वेलजाळी | 125 |
| त्रय डुंबरे | 129 |
| ा काळकटे | 133 |
| ान पवार | 136 |
| श बनकर | 139 |
| ास खोंडे | 143 |
| आंबेकर | 147 |
| प राठोड | 151 |
| ाधा मोरे | 155 |
| त्रय शिंदे | 159 |
| ा गांगुर्डे | 169 |

rney2014gmail.co

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

## Editorial Board

**Chief Editor -**
**Dr. Dhanraj T. Dhangar,**
**Assist. Prof. (Marathi)**
**MGV'S Arts & Commerce College,**
**Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA**

**Executive Editors :**
**Prof. Tejesh Beldar, Nashikroad (English)**
**Dr. Gajanan Wankhede, Kinwat (Hindi)**
**Mrs. Bharati Sonawane-Nile, Bhusawal (Marathi)**
**Dr. Rajay Pawar, Goa (Konkani)**

**Co-Editors -**
- **Mr.Tufail Ahmed Shaikh**- King Abdul Aziz City for Science & Technology, Riyadh, **Saudi Arabia.**
- **Dr. Anil Dongre** - Head, Deptt. of Management, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. Shailendra Lende** - R.T.M. Nagpur University, Nagpur **[M.S.] India**
- **Dr. Dilip Pawar** - BoS Member (SPPU), Dept. of Marathi, KTHM College, Nashik.
- **Dr. R. R. Kazi** - North Maharashtra University, Jalgaon.
- **Prof. Vinay Madgaonkar** - Dept. of Marathi, Goa University, **Goa, India**
- **Prof. Sushant Naik** - Dept. of Konkani, Govt. College, Kepe, **Goa, India**
- **Dr. G. Haresh** - Associate Professor, CSIBER, Kolhapur **[M.S.] India**
- **Dr. Munaf Shaikh** - N. M. University, Jalgaon & Visiting Faculty M. J. C. Jalgaon
- **Dr. Samjay Kamble** -BoS Member Hindi (Ch.SU, Kolhapur), T.K. Kolekar College, Nesari
- **Prof. Vijay Shirsath** - Nanasaheb Y. N. Chavhan College, Chalisgaon **[M.S.]**
- **Dr. P. K. Shewale** - Vice Principal, Arts, Science, Commerce College, Harsul **[M.S.]**
- **Dr. Ganesh Patil** - M.V.P.'s, SSSM, ASC College, Saikheda, Dist. Nashik **[M.S.]**
- **Dr. Hitesh Brijwasi** - Librarian, K.A.K.P. Com. & Sci. College, Jalgaon **[M.S.]**
- **Dr. Sandip Mali** - Sant Muktabai Arts & Commerce College, Muktainagar **[M.S.]**
- **Prof. Dipak Patil** - S.S.V.P.S.'s Arts, Sci. and Com. College, Shindhkheda **[M.S.]**

**Advisory Board -**
- **Dr. Marianna kosic** - Scientific-Cultural Institute, Mandala, **Trieste, Italy.**
- **Dr. M.S. Pagare** - Director, School of Languages Studies, North Maharashtra University, Jalgaon
- **Dr. R. P. Singh** -HoD, English & European Languages, University of Lucknow **[U.P.] India**
- **Dr. S. M. Tadkodkar** - Rtd. Professor & Head, Dept. of Marathi, Goa University, **Goa, India.**
- **Dr. Pruthwiraj Taur** - Chairman, BoS., Marathi, S.R.T. University, Nanded.
- **Dr. N. V. Jayaraman** - Director at SNS group of Technical Institutions,**Coimbatore**
- **Dr. Bajarang Korde** - Savitribai Phule Pune University **Pune, [M.S.] India**
- **Dr. Leena Pandhare** - Principal, NSPM's LBRD Arts & Commerce Mahila Mahavidyalaya, Nashik Road
- **Dr. B. V. Game** - Act. Principal, MGV's Arts and Commerce College, Yeola, Dist. Nashik.

**Review Committee -**
- **Dr. J. S. More** – BoS Member (SPPU), Dept. of Hindi, K.J.Somaiyya College, Kopargaon
- **Dr. S. B. Bhambar,** BoS Member Ch.SU, Kolhapur, T.K. Kolekar College, Nesari
- **Dr. Uttam V. Nile** - BoS Member (NMU, Jalgaon) P.S.G.V.P. Mandals ACS College, Shahada
- **Dr. K.T. Khairnar**– BoS Member (SPPU), Dept. of Commerce, L.V.H. College, Panchavati
- **Dr. Vandana Chaudhari** KCE's College of Education, Jalgaon
- **Dr. Sayyed Zakir Ali** , HOD, Urdu & Arabic Languages, H. J. Thim College, Jalgaon
- **Dr. Sanjay Dhondare** – Dept. of Hindi, Abhay Womens College, Dhule
- **Dr. Amol Kategaonkar** – M.V.P.S.'s G.M.D. Arts, B.W. Commerce & Science College, Sinnar.

**Published by –**
© Mrs. Swati Dhanraj Sonawane, Director, Swatidhan International Publication, Yeola, Nashik
Email : swatidhanrajs@gmail.com Website : www.researchjourney.net Mobile : 9665398258

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 1 | साहित्य आणि संस्कृती | डॉ.शिरीष लांडगे | 05 |
| 2 | आदिवासी समाज, संस्कृती आणि इतिहासाच्या पाऊलखुणा | डॉ. तुकाराम रोंगटे | 09 |
| 3 | साहित्य, समाज आणि समकालीन संदर्भ | डॉ.वेदश्री थिगळे | 14 |
| 4 | कामगार कविता प्रवृत्ती (कालखंडानुसार) | डॉ.दिलीप पी.पवार | 21 |
| 5 | साहित्य आणि सामाजाचे अनुबंध | डॉ.शंकर बोऱ्हाडे | 30 |
| 6 | दासबोध ग्रंथातील समाजदर्शन | डॉ. सुरेश जाधव | 33 |
| 7 | साहित्याचे सामाजिक अवलोकन | डॉ.गोविंद रामदिनवार | 36 |
| 8 | साहित्याचे समाजशास्त्रीय संशोधन | डॉ.पौर्णिमा बोडके | 41 |
| 9 | शाहिरी वाङ्मयातील समाज चित्रण | प्रा.माधव खालकर | 44 |
| 10 | मराठी साहित्य आणि समाजपरिवर्तन | डॉ.अशोक लिंबेकर | 50 |
| 11 | लोकसाहित्याचे कलात्मक सौंदर्य | डॉ.शांताराम चौधरी | 53 |
| 12 | साहित्य आणि समाज : परस्पर संबंध | डॉ.अरुण पाटील | 64 |
| 13 | साहित्य आणि समकालीन संदर्भ | डॉ.समिता जाधव | 69 |
| 14 | साहित्य आणि सामाजिक शास्त्रे : अनुबंध | डॉ.किरण पिंगळे | 73 |
| 15 | माध्यमांतर होऊ शकणारी मराठीतील साहित्यकृती : भूमी कादंबरीसंदर्भात | डॉ. सायली आचार्य | 77 |
| 16 | पसायदानातील समाजप्रबोधन | डॉ.छाया शिंदे | 82 |
| 17 | साहित्याचे समाजशास्त्र | डॉ.कार्तिकी नांगरे | 86 |
| 18 | साहित्याचे समाजशास्त्र | डॉ.प्रतिभा घाग | 89 |
| 19 | मराठी साहित्यकृतीचे माध्यमांतर :एक अभ्यास | प्रा.एम.एल.भुसारे | 92 |
| 20 | आदिवासी साहित्य : समाज आणि संस्कृती अनुबंध | अनिल वळवी व डॉ.राजेंद्र ठाकरे | 95 |
| 21 | साहित्य आणि समाज यांचा परस्पर संबंध | श्री.तुषार भोसले | 105 |
| 22 | साहित्य व समाज परस्परसंबंध | प्रा.स्वाती निकम | 109 |
| 23 | ठाणे जिल्ह्यातील आदिवासी सणांचे साहित्य | डॉ.सुनिलदत्त गवरे | 113 |
| 24 | समकालीन साहित्य आणि कथा वाङ्मय | सारिका मोहिते | 116 |
| 25 | बदलते ग्रामीण साहित्य आणि कृषीजीवन | डॉ.अशोक भवर | 120 |
| 26 | साहित्य, समाज, भाषा आणि संस्कृती परस्परसंबंध | डॉ.दत्तात्रय वेलजाळी | 125 |
| 27 | संतांची सामतेची गुढी | डॉ. दत्तात्रय डुंबरे | 129 |
| 28 | साहित्याची सामाजिकता | प्रा.कैलास कळकटे | 133 |
| 29 | साहित्य व समाज परस्परसंबंध (आदिवासी कादंबरीच्या संदर्भात) | प्रा.सुलतान पवार | 136 |
| 30 | शाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजदर्शन | प्रा.महेश बनकर | 139 |
| 31 | फुले, शाहू,आंबेडकर : साहित्य आणि शिक्षण | डॉ.कैलास खोंडे | 143 |
| 32 | साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंध | प्रा.शरद आंबेकर | 147 |
| 33 | आदिवासींचे सांस्कृतिक रुपांतरं : स्वरूप आणि साहित्य | प्रा.सुदाम राठोड | 151 |
| 34 | साहित्याचे समाजशास्त्र | प्रा.अनुराधा मोरे | 155 |
| 35 | साहित्य व संस्कृती परस्पर संबंध | श्री. दत्तात्रय शिंदे | 159 |
| 36 | आदिवासी साहित्यातून प्रकट होणारे समाजजीवन | श्रीम.सारिका गांगुर्डे | 169 |

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019


| अ.क्र. | लेखाचे शीर्षक | लेखक/ लेखिका | पृ.क्र. |
|---|---|---|---|
| 37 | माध्यमांतर होऊ शकणाऱ्या मराठीतील साहित्यकृती | प्रा.पूनम वाघ | 173 |
| 38 | यंत्र – तंत्रज्ञानाधिष्ठीत साहित्याची वाटचाल | डॉ. प्रमोद आंबेकर | 176 |
| 39 | समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध | योगिता भामरे | 180 |
| 40 | साहित्य व समाज परस्परसंबंध | प्रा.दत्तात्रय सावंत | 188 |
| 41 | साहित्यकृतींचे माध्यमांतर : स्वरूप व उपयोजन | प्रा.अर्चना बोराडे | 191 |
| 42 | समाजज्ञानासाठी साहित्याची निर्मिती | डॉ.सुरेखा जाधव | 196 |
| 43 | साहित्य : संस्कृती – स्वरूप व भूमिका | डॉ.संजय शिंदे | 199 |
| 44 | मध्ययुगीन साहित्यातील स्त्री जाणीवा | प्रा.अश्विनी महाले व डॉ.दत्तात्रय डुंबरे | 202 |
| 45 | साहित्य व समाज – संबंध | डॉ. चंद्रकांत रुद्राक्षे | 206 |
| 46 | भाषा,साहित्य आणि संस्कृती | डॉ.आनंद वारके | 210 |
| 47 | साहित्य आणि समाज – परस्परसंबंध | डॉ.माधवी खरात | 214 |
| 48 | बदलता भारतीय समाज आणि कवितेचा प्रतिसाद | प्रा.विद्या सुर्वे बोरसे | 217 |
| 49 | साहित्य, समाज व संस्कृती : एक आकृतिबंध | प्रा.नामदेव गावित | 221 |
| 50 | समाज आणि साहित्य | हिरा वाघ | 226 |
| 51 | साहित्य आणि समाज परस्पर संबध | प्रा.शिवाजी सुंभे | 229 |
| 52 | बैरागी (वैष्णव) साहित्यातील समाज दर्शन | डॉ. बाळासाहेब बैरागी | 232 |
| 53 | साहित्य व संस्कृती परस्पर संबंध | प्रा. ललिता सोनवणे | 236 |
| 54 | साहित्याचे माध्यमांतर : एक अभ्यास | डॉ. माधव कदम | 240 |
| 55 | साहित्य आणि समाजशास्त्र परस्पर संबंध | प्रा. माधुरी गवळी | 242 |
| 56 | साहित्य आणि समाज परस्पर संबंध : एक अभ्यास | डॉ. उन्मेष शेकडे | 245 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी राखून ठेवले आहेत. प्रकाशक, संपादक यांच्या लेखी पूर्वपरवानगी शिवाय यातील लेखांचे पुनर्प्रकाशन करता येणार नाही. या विशेषांकातील लेखांतून/संशोधन निबंधांतून व्यक्त झालेली मते ही त्या संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत, त्याच्याशी संपादक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. लेखांच्या मूळ स्वामित्व हक्काविषयीची (कॉपी राईट्स संदर्भातील) सर्वस्वी जबाबदारी संबंधित लेखकांची आहे.*

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) – 6.261, (CIF ) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

# कामगार कविता प्रवृत्ती (कालखंडानुसार)

डॉ. दिलीप पी.पवार
विभागप्रमुख, मराठी विभाग
के.टी.एच.एम.महाविद्यालय
गंगापूर रोड, नाशिक
dppawar9@gmail.com

काव्यवृत्ती म्हणजे विशिष्ट अर्थात प्रतिभा शक्ती. काव्यास्वादासाठी प्रतिभासंपन्न कवी सहृदय रसिक यांच्यात हृदय संवाद घडणे आवश्यक असते. प्रा. लक्ष्मीकांत तांबोळी म्हणतात, ''अंतर्मुखता काव्य वृत्तीची पहिली अट आहे. बाह्य जगात वा ऐहिक गोष्टीत न रमणारा, आपल्या स्वत:च्या आंतरिक विश्वात सतत मग्न असणारा कल्पना प्रेरणतेकडे कल असलेला, एकांतप्रिय स्वत:च्या भावविश्वास गुंतलेला, सर्वसामान्यांसारखा न वागणारा असा कोणीही वा वृत्तीचा किंवा तिच्या जवळपासचा असू शकतो.''[१] सर्जनशीलता ही काव्यवृत्तीची दर्शणी खूण असते. तर जीवनातील घटना, प्रसंग, व्यक्ती याकडे कवीची विशिष्ट पद्धतीने बघण्याची वृत्ती याला आपण अनुभव घेण्याची पद्धत असे म्हणतो. कवी अनुभवाकडे या दृष्टीने बघतो, ती त्याची वृत्ती असते. यानुसार प्रत्येक कवीची अनुभवाकडे पाहण्याची दृष्टी जशी भिन्न असते त्यानुसार त्याची काव्यवृत्ती भिन्न ठरते. कवीच्या अभिव्यक्तीवरून कवीची प्रवृत्ती ठरते. उदा. गंभीरवृत्ती, विनोदी वृत्ती, एककेंद्री वृत्ती इ. मराठीतील कामगार कवितांच्या प्रवृत्तींचा वरील दृष्टिकोनातून आढावा घेणे संयुक्तिक ठरेल. मात्र हे करताना त्या त्या काळातील एकूण लेखन प्रवृत्तींचा आधार घेणे क्रमप्राप्त राहील.

साठोत्तरी मराठी कवितेमागे सुमारे सातशे वर्षाची समृद्ध परंपरा आहे. तेरा ते अठरा या शतकांमधील कविता संत, पंत व तंत शाहीर यांची कविता आहे. जी पारमार्थिक वळणाची व मध्ययुगीन जाणिवांची निदर्शक होती. या व नंतरच्या अर्वाचीन कालखंडातील काव्यपरंपरेशी झगडा करत आणि दोन्ही कालखंडातील काव्य गुणविशेष शोषून घेत आजची कविता वाटचाल करीत आहे. त्यामुळे आजच्या विविध प्रवाहांतील कवितेतील प्रेरणा-प्रवृत्तींचा विचार करताना पूर्वपरंपरेवर धावता दृष्टिक्षेप टाकणे क्रमप्राप्त ठरते.

### १८०० ते १८७४ कालखंड

१८०० ते १८७४ हा अव्वल इंग्रजीचा कालखंड किंवा भाषांतर युग असल्यामुळे या कालखंडात इंग्रजी साहित्याचे भाषांतर व अनुकरण झालेले आढळते. ''जुन्या मराठी राजवटी लयाबरोबर बहिर्मुख, शाहिरी परंपरा लुप्तप्राय झाली. आणि 'निर्वेध' या अंत:प्रेरणेवर अधिष्ठित असलेली अंत:र्मुख भक्तिपरंपरा पुढे नव्या इंग्रजी राज्यात अखंडित राहिली. परंतु तिच्यात पूर्वीचा जोर राहिला नाही.''[२] इंग्रजी राजवटीचा प्रभाव केवळ राजकारणापुरताच मर्यादित नव्हता तो थोड्याच अवधीत धर्म, समाज, व्यापार, व्यवहार यांच्यापर्यंत पसरला.

इंग्रजांच्या आगमनाबरोबरच महाराष्ट्रात इंग्रजी भाषा आणि पाश्चात्य विद्येचे अध्ययन सुरू झाले. सत्ता गेली परंतु नव्या संस्कृतीशी आलेल्या संपर्काने उलटसुलट विचारांना गती मिळाली. अन् सुरू झालेल्या प्रबोधनयुगात जुनी काव्यपरंपरा गोंधळून गेली. पुरातन पारमार्थिक संवेदना ऐहिकतेच्या प्रभावाखाली दबली गेली. अन राजाश्रयाविना शाहिरीला अवकळा आली. जुनी काव्यपरंपरा क्षीण होऊन पारमार्थिक प्रवृत्ती आणि मध्ययुगीन लौकिक जाणिवा यांची जागा आधुनिक वळण घेतलेल्या मराठी कवितेतील लौकिक जीवनाच्या नव्या जाणिवांची आणि आधुनिक मूल्यांच्या निष्ठेने घेतली. त्यामुळे १८८५ ते १९४० या कालखंडातील

कविता सौंदर्यवादी प्रवृत्तीची कविता म्हणून ओळखली जाते. असे असले तरी कवींच्या प्रत्येक पिढीत अन्य प्रवृत्तीदेखील प्रत्ययास येतात.

या कालखंडातील मराठी कविता इतर वाङ्मय प्रकारांप्रमाणेच निस्तेज सत्त्वशून्य परभृत होती. मराठी गद्याचा इंग्रजी अवतार असा हा कालखंड असल्याने सर्व ग्रंथसंपदा ही सामान्य दर्जाची होती. सामान्यांना पोवाड्यातल्या 'वीरश्रीबद्दल' शौर्याला वाव नसल्यामुळे विशेष रस उरला नव्हता. इंग्रजी प्रेमापुढे लावणीतील उत्तान शृंगाराबद्दल फारसे कौतुक राहिले नव्हते. पांडित्याला भक्ती प्रवृत्तीची जोड देऊन या कालखंडात संस्कृत काव्याची पद्य रूपांतरे वा भाषांतरे होत होती.

शालेय उपेदशपर कविता ही या काळात लिहिली गेली एकूणच या कालखंडामध्ये परशुराम तात्या गोडबोले या ज्येष्ठ कवीपासून म.मो.कुंटे या कवीपर्यंतच्या कवींनी आपल्या काव्यातून अध्यात्माला नवा अर्थ देणे, उपदेश, नीतीशिक्षण, संस्कृतचे मराठीकरण, नाटकी कविता, ऐतिहासिक पुरुषांचे उदात्तीकरण इ. प्रवृत्तींचे उन्नयन केले.

याच कालखंडात लोककवींची देखील एक परंपरा उदयास आली. ''या लोककवींपैकी बहुतेक जणांची भूमिका समाजसेवकाची होती. ते अगोदर समाजसेवक होते व नंतर कवी होते. या समाजसेवक कवींनी आपल्या देशबांधवांच्या उद्धारासाठी आमरण स्वत:ची वाणी शिणविली व लेखणी झिजविली. यापैकी अनेक कवी हे स्वत: कर्ते सुधारक होते.''[३] या कवींनी समाजसुधारणेला प्राधान्य दिले मात्र हे ध्येय साधताना त्यांची कविता संपुष्टात आली. या कवितेचा त्यांनी साधन म्हणून उपयोग केला. कामगार कवितेच्या अनुषंगाने समाजात सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रभावी पावले टाकणारे म. जोतिराव फुले व विष्णू परशरामशास्त्री पंडित यांच्या काव्यप्रवृत्तींचा विचार करावा लागेल. कवी पंडित आपल्या कवितेतून परदेशी वस्तूंच्या भरमसाठ आयातीमुळे स्वदेशी वस्तूंची व त्या निर्माण करणाऱ्या शिल्पिजनांची दयनीय अवस्था विशद करताना म्हणतात,

''देशी वस्तूंची पायमल्ली। इंग्रजी वस्तूंनी अतिशय केली
कारागिरांची दारे झाकली। उपास लोके काढू लागली''[४]

इंग्रजी व्यापारी देशातील उद्योगधंद्यांना बुडवून स्वत: कसे गब्बर होत आहे व त्या एतद्देशियांस कंगाल करीत आहे, हे दु:ख या कवितेतून व्यक्त होते.

कवी बेरडे यांनी या देशातील कापसाच्या निर्यातीकडे जनतेचे लक्ष वेधले असून इथल्या कच्च्या मालावर विलायतेकडील भांडवलवाले कसा अवास्तव नफा मिळवित आहे हे निदर्शनास आणून दिले.

म.फुलेंचे गद्य लेखनापेक्षा त्यांचे पद्य लेखन अधिक प्रभावी होते. त्यांच्या मनावर ख्रिस्ती मतांचा प्रभाव होता. ''जोतिबांच्या प्रतिगामी भयभिक्षुकांवर फार मोठा राग होता, तो त्या काळातील प्रतिक्रियेच्या स्वरूपाचा होता.''[५] ते म्हणतात,

''सरकार पट्टी नेट। पडे तीन शेंड्या गांठ
कर्जरोखी लिहणे आट। कुलकर्ण्यांनें लिहिणे काट
वकिलाची महागाई। न्यायाधिशा दया नाही''[६]

भोळ्या भाबड्या शेतकऱ्यांची करुण कहाणी विशद करताना त्यांना नाडणारे मारवाडी, सावकार व ब्राह्मण कारकून यांच्याविषयीचा संताप ते प्रकट करतात. एकूणच या लोककवींची जीवनाशी एकरूपता असल्यामुळे त्यांच्या लेखनात समाजसुधारणावादी प्रवृत्तींतून त्यांच्या काळच्या धार्मिक, सामाजिक, औद्योगिक समाजसुधारणावादी प्रवृत्तींतून त्यांच्या काळच्या धार्मिक, सामाजिक, औद्योगिक, राजकीय इत्यादी क्षेत्रातील

ISSN : 2348-7143
January-2019

चळवळीचे प्रतिबिंब पडलेले पाहावयास मिळते. खऱ्या अर्थाने कामगार साहित्य चळवळीचा (त्यातल्या त्यात कामगार कवितेचा) प्रारंभ म.फुले व या अन्य लोककवींच्या कवितेतून झाला, असे म्हणावयास हरकत नाही.

**१८७५-१८८६ कालखंड**

या कालखंडात युग संक्रमणाचे स्वरूप अधिक स्पष्ट आहे. प्रा.शिशिकांत ठकार म्हणतात, ''इंग्रजी काव्यातील साधेपणाचे सौंदर्य, नावीन्य, वैचित्र्य, निर्यमकत्व, अभिव्यक्ती सौंदर्य यांचे आकर्षण वाढीस लागून पंडिती काव्याचे संस्कृत आदर्श मागे पडू लागले. समाजपरिस्थितीतही नव्या सुधारणा होत होत्या. त्याचे प्रतिबिंब प्रासंगिक कवितांत पडू लागले''[७] या कालखंडात ऐतिहासिक लेखन उपदेशपरता, प्रासंगिक लेखन, करुणरसात्मकता, भावपरता, जातिरचना, हरिदासी संगीताची ओढ, सामाजिक चित्रण,चिंतन व निसर्गवर्णनपर लेखन इत्यादी प्रवृत्तींतून काव्यलेखन झाल्याचे दिसते. ही कविता सामान्य दर्जाची होती, असे असले तरी क्रांतीचे वारे कोणत्या दिशेने वाहणार याचे संसूचन ती करत होती.

**१८८६ ते १९२० कालखंड**

या कालखंडातील कवितेने आत्मलक्षी स्वरूप सिद्ध केल्यामुळे हा मराठी कवितेचा क्रांतिकाल मानला जातो. ''नव्या आकांक्षा, नव्या प्रेरणा आणि त्यांना रूपांतरित करणाऱ्या व नवे रूप प्रकार यांनी केशवसुतकालीन कविता उजळून गेली.''[८] मात्र याच कालखंडात पूर्वार्धामध्ये केशवसुतांच्या क्रांतीचा यांना स्पर्श झाला नाही अशा कवींच्या काव्यात संस्कृत प्रचुरता, अलंकृतता, प्रौढ उपदेश, ईश्वर श्रद्धा, औपहासिकता इत्यादी प्रवृत्ती आढळतात. केशवसुतांनी मात्र आत्मनिष्ठेला व सामाजिक जाणिवेला प्राधान्य देऊन उपेक्षित वर्गाला कवितेचा विषय बनविले, कामगार वर्गांशी असलेले नाते दृढ केले. प्रा. निशिकांत ठकार म्हणतात, ''जुन्या दीर्घ कथन प्रधान काव्याची जागा नव्या स्फुट भावप्रधान काव्याने घेतली. अध्यात्म, धार्मिकता, भक्ती यांच्याऐवजी लौकिक, सामाजिक, वैयक्तिक विषयांना महत्त्व आले. काव्य साधन नसून साध्य असल्याची जाणीव होऊ लागली. त्याची आत्मनिष्ठा वाढीस लागली ही सर्व लक्षणे नव्या निष्ठेने व उन्मेषाने प्रकट झाली. पूर्वी पद्यात काहीही लिहिणारा तो कवी होता. आता पद्य आणि कविता यातील अंतर स्पष्ट झाले. काव्य म्हणजे आत्माविष्कार ही संकल्पना या काळापासून दृढ होत गेली.''[९] काव्यक्षेत्रातील ही उलथापालथ एक प्रकारची क्रांतीच होती.

टिळक आगरकरांच्या राजकीय आणि सामाजिक क्रांतीच्या या युगात सुधारणावादाचे मूळ धरले होते. राष्ट्रीय शिक्षण, स्वदेशी वगैरे चळवळी चालू होत्या. सनातनी आणि सुधारक यांच्यामध्ये सामाजिक मूल्यांवरून संघर्ष माजलेला होता. सामाजिक रूढींविषयीचा तिरस्कार स्पष्टपणे व्यक्त होत होता. समता, स्वातंत्र्य, बंधुता व मानवता यांचा उद्घोष होऊन सर्वसामान्य व्यक्तींची सुख दुःखे आशा, निराशा व स्वप्ने यांना महत्त्व येऊ लागले होते. या कालखंडात सुधारणावादी, रोमँटिसिझम, आत्मनिष्ठता, स्वच्छंदतावादी दृष्टी, अलौकिकाचा ध्यास, राष्ट्रवाद आदी प्रवृत्ती प्रधान मानून काव्यलेखन झालेले दिसते. याच कालखंडातील उत्तरार्धात (१९०५ ते १९२०) आत्मशोधक वृत्ती, प्रयोगशीलता, निसर्गप्रियता, गूढरम्यता, स्वप्नाळूवृत्ती, अतिमानुषता, समाजसुधारणेतील रूढ-विद्रोह, प्रेम कल्पनेतील बंधमुक्ती, वृत्तबद्धता, कवितारती, अध्यात्मनिष्ठा, सामान्यांशी सहानुभाव, प्रणयभावना, परमनप्रवेश, व्यक्तिविशिष्ट अनुभवदर्शन, राष्ट्रीय जाणीव, ध्येयवाद आदी प्रवृत्तींतून काव्यलेखन झालेले दिसते. केशवसुत वगळता कष्टकरी, श्रमजीवी वर्गाची वेदना अन्य कवींच्या काव्यात अभावानेच आढळते.

१९२१ ते १९४५ कालखंड

१९२० च्या आसपास बालकवी, गडकरी, रे टिळक इत्यादी कवींचे निधन झाल्यामुळे काव्यक्षेत्रात विलक्षण पोकळी निर्माण झाली. या पार्श्वभूमीवर रविकिरण मंडळाची स्थापना व कार्य ही पोकळी भरून काढण्यास साहाय्यभूत झालेली दिसते. प्रा.निशिकांत ठकार म्हणतात, ''मंडळाच्या प्रेरणा पुरोगामी होत्या. काव्य आणि सामाजिक विचारांच्या संबंधात रविकिरण मंडळे हा कवि संप्रदाय होता. तसाच तो एक सामाजिक प्रयोग होता, असे मंडळाच्या सदस्यांनी म्हटले आहे.''[१०] केशवसुती काव्यक्रांतीच्या स्थैर्याचा व विस्ताराचा हा कालखंड होता. कारण पूर्वसूरींच्या निसर्ग कवितेत रविकिरण मंडळाने प्रेमकवितेची भर टाकली व काव्यस्तरावर अनेक प्रयोगही केले. माधव ज्युलियन यांची कविता गो.वि.करंदीकर म्हणतात त्याप्रमाणे केशवसुत व मर्ढेकर यामधील दुवा ठरली. कारण माधव ज्युलियन यांनी सामाजिक संदर्भाची व मध्यम वर्गीयांच्या भावजीवनाची उपहासपूर्ण व उपरोधपूर्ण जाणीव आपल्या कवितेतून व्यक्त केली. हे जरी खरे असले तरी समकालीन क्रांतिकारक घटनांकडे दुर्लक्ष व सामाजिक सुधारणांचा मूलभूत विचार न केल्यामुळे ते समाजवादी विचारांच्या जवळ येऊ शकले नाही असा विरोधी सूर अनेकजणांनी आवळल्याचे दिसते. केशव शिरवाडकर म्हणतात, ''१९३० पासून मार्क्सवादाचा महाराष्ट्रात प्रभाव वाढत होता या काळातील प्रमुख कविता होती रविकिरण मंडळाची आणि ती प्राय: आत्मकेंद्री परदृष्ट आणि समाज विमुख होती.''[११] थोडक्यात रविकिरण मंडळाची कविता जीवनाला मर्यादित स्पर्श करणारी होती. आत्मलेखनाची हौस, भावनेची उत्कटता, उत्तानता, स्वच्छंदता, निराशावाद ही रविकरणी कवींची काव्यलेखनामागील वृत्ती दिसते.

अनंत काणेकर यांनी या प्रभावातून मुक्त होण्याची एक दिशा दाखवली. त्यांच्या 'चांदराती' या कवितेतून रचनेचा अपवाद वगळता जाणिवांमध्ये बदल होत असल्याचे जाणवते. मध्यमवर्गीय स्वप्नरंजनातून ते बाहेर पडू पाहतात व क्रांतीच्या रक्तध्वजाची गाणी गाऊ लागतात. कारण त्यांना उगवणाऱ्या चांदण्याच्या उषेवर विश्वास आहे. १९३५ च्या आसपास रविकिरण मंडळातील सांकेतिकतेच्या कोंडीतून बाहेर पडण्यासाठी प्रयत्नही सुरू होता. यात माधव ज्युलियन, अनंत काणेकर, केशवकुमार यांचा विशेष पुढाकार होता.

१९३५ ते १९४५ हे दशक नव्या मर्ढेकरी क्रांतीच्या पूर्वतयारीचे दर्शक म्हटले जाते. अनिलांनी मानवतावादाचे व कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ सामाजिक जाणिवांच्या प्रखर अभिव्यक्तिने मराठी कवितेची कोंडी फोडली व नवकाव्याचे दालन खुले केले. अनिलांच्या काव्यलेखनात मानवतावाद, आत्मनिष्ठा, निसर्गसंवाद, समाजाभिमुखता आदी प्रवृत्तींचे दर्शन घडते. कुसुमाग्रजांच्या कवितेत समाजभिमुखता, राष्ट्रीयता, प्रेमाविष्कार, अज्ञाताभिमुखता व निसर्ग प्रीती इत्यादी प्रवृत्तींचे दर्शन घडते.

डॉ.अक्षयकुमार काळे म्हणतात, ''अनिल, कुसुमाग्रज आदी कवींची पूर्वार्धातील सामाजिक कविता आर्थिक दुरवस्थेच्या संदर्भात आपला विखार व त्वेष प्रकट करते. आर्थिक विषमतेचा व दुरावस्थेचा विचार तत्कालीन फोफावत जाणाऱ्या मार्क्सवादी विचार प्रणालीने अधिक तीव्र झाला. तथापि एका संपूर्ण निष्ठेने मार्क्सवादाचा स्वीकार या कवींनी केलेला दिसून येत नाही. म्हणूनच कालांतराने हे दोन्ही कवी मार्क्सवादापासून दूर सरकलेले दिसतात.''[१२] एकूणच या कालखंडातील कवी, कवयित्री यांच्या कवितेत मानवतावाद, अग्निसांप्रदायिकता, प्रयोगशिलता, अनुकरणशीलता, प्रेमसंवेदना, श्रृंगार शक्ती, सांप्रदायिक ईश्वरभक्ती, जीवनविषयक उदात्तता, क्रांतिकारकता इ. प्रवृत्तींचे प्रत्ययकारी दर्शन घडते.

१९४५ ते १९६० कालखंड

या कालखंडात दुसरे महायुद्ध सुरू होते पण त्याचे आर्थिक, सामाजिक परिणाम जगाला नंतर जाणवू लागले. अणुबॉम्बचा शोध आणि प्रयोग याने सर्व जग भयचकित झाले ही आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्थिती होती. जगाच्या एका मोठया भागावर साम्यवादी विचारसरणी दृढमूल झालेली होती. हिंदुस्थानात मात्र १९४२ ते

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)–0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

१९४७ हा कालखंड स्वातंत्र्याच्या क्रांतीचा सर्वात मोठा प्रयत्नकाल होता. स्वातंत्र्यानंतर भारतात शुद्ध स्वरूपात लोकशाहीवाद प्रस्तुत झाला असा दावा केला जात होता. या पार्श्वभूमीवर ना.ग.जोशी म्हणतात, "व्यक्तिस्वांतत्र्यवादी प्रागतिक विचारसरणीवर पोसलेली भारतीयांची विचारसरणी ही, सामाजिक, आर्थिक संबंधांना प्राधान्य देणाऱ्या साम्यवादी विचारसरणीने चकित आणि क्षुब्ध होत आहे. अशा संमिश्र विचार प्रवाहांच्या अनेकरंगी भुलभुलैय्यांत सर्वच जग अगतिक झाल्यासारखे भासतात, तर त्याला साहित्यिक किंवा कवीच अपवादभूत कसे होतील?"[१३] साहित्यातून साहित्यिक समाजजीवन मांडत असतो. वरील विधानाचा विचार करताना १९४५ च्या काळातील परिस्थिती पालटू शकते अशी कुठलीच विचारसरणी अथवा मूल्ये मर्ढेकरांना मान्य नव्हती. निरनिराळ्या ज्ञानशाखांमध्ये चाललेले संशोधन आणि नवनव्या विचारप्रणाली यामुळे मानवाच्या पूर्वकल्पनांमध्ये या कालखंडात व तत्पूर्वी कमालीची उलथापालथ झाली. चार्ल्स डार्विन, कार्ल मार्क्स, सिग्मंड फ्राइड आणि अल्बर्ट आइनस्टाइन यांनी व त्यांच्या सहकार्याने केलेल्या क्रांतिकारक संशोधनाने मानवी विचारविश्व ढवळून निघाले होते. मानवाच्या आर्थिक आणि सामाजिक इतिहासाचा कसोशीने अभ्यास करणारा कार्ल मार्क्स व त्याच्या तत्त्वज्ञानाचा विसाव्या शतकातील जगावर मोठा प्रभाव पडत होता. १९४२ सालच्या भारतीय जनआंदोलनात सहभागी होण्यास भारतीय साम्यवादी पक्षाने नकार दिला होता. त्यामुळे चिंतनशील व वैचारिक लेखन करणाऱ्या कवींनी पुन्हा पुन्हा मार्क्सचा विचार केलेला पाहावयास मिळतो. नवकाव्य हे प्रयोगवादी काव्य होते. प्रतिमा हे त्याचे वैशिष्ट्ये होते. "सामाजिक परिस्थितीमुळे बदललेल्या त्या जीवनाचा अन्वयार्थ लावण्याची कवींची धडपड सुरु झाली व त्यामुळे काव्याला बौद्धिक अधिष्ठान लाभले. अनेक राजकीय, सामाजिक, मानसशास्त्रीय इत्यादी विचारसरणीचा या काव्यावर प्रत्यक्ष प्रभाव पडू लागला. विज्ञानाचेही परिणाम या कवितेने स्वीकारले."[१४] मर्ढेकर यांच्या कवितांमधून साम्राज्यवाद व भांडवलशाही यांचे दुष्परीणाम, दैन्य आणि लाचारी, स्वार्थ आणि ढोंग, यांत्रिकता व अमानुषता, माणूसकीचा ऱ्हास, महायुद्धांचे परिणाम इत्यादी वास्तव जीवनाचे उपरोधाने, उपहासाने, तिरस्काराने व कारुण्याने वेध घेताना दिसतात.

साम्यवादी विचारधारेने प्रधान मानलेले मानतावादाचे दर्शन, व्यक्ति-विश्व, वस्तुनिष्ठा-आत्मनिष्ठा, प्रयोगशीलता, चिंतनशीलता, सात्विक उदात्तता, निरामयता, तरलता, चित्रात्मकता, एकाक्षरत्व, संज्ञाप्रवाहीपण इत्यादी प्रवृत्तींचा त्यांच्या काव्यातून पदोपदी प्रत्यय येतो.

शरच्चंद्र मुक्तिबोध यांना समष्टीवादी मानवतावाद अपेक्षित होता.

"समष्टीचे रक्त तुझ्या धमन्यात प्रवाहित
समष्टीच्या चैतन्याने तुझे प्राण प्रकाशित"

"ही 'मी' ला 'आम्ही' करणारी जाणीव किंवा प्रवृत्ती दिसते. "जनशक्तीवरील विश्वास, समष्टीची आंतरिक चेतना, समतेची निष्ठा, वास्तवाची जाण, समाजवादी सिद्धांताची स्वीकृती यांतून प्रचलित समाजव्यवस्थेच्या विद्रुपाविरुद्ध विद्रोह पेटून उठतो. त्याला आशावादी असणे अटळच असते."[१५] परिस्थितीला बदलू पाहणारी क्रांतीची भाषा व कवीच्या वृत्तीतून प्रकट होते.

सामाजिक जीवनातील दैन्य, दांभिकता, विषमता, मूल्यनाश यांचे प्रभावी चित्रण य.द.भावे करतात.

मार्क्सवादी तत्त्वज्ञान आणि अध्यात्म यांचे द्वंद विंदांच्या काव्यात नेहमीच जाणवत राहिल्यामुळे 'क्रांतीची पोझ' घेतलेल्या या कवीच्या काव्यात दुंभगलेपण आले आहे. त्यामुळे मार्क्सवादाबरोबरच अस्तित्ववाद, अद्वैतवाद, फ्राईड सिद्धांत इत्यादी प्रेरणा प्रभाव यांच्या काव्यात जाणवतात. जीवनसन्मुख असलेल्या या कवीची प्रयोगशीलता ही प्रवृत्ती लक्षणीय आहे. निर्भयता, फटकळपणा, उपरोध हे वृत्ती विशेष त्यांच्या चिंतनशीतेतून उगम पावलेले दिसतात. वसंत बापट व मंगेश पाडगावकर हे कवी साम्यवादाच्या

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Impact Factor - (SJIF) - 6.261, (CIF) - 3.452(2015), (GIF)-0.676 (2013)
Special Issue 111 (B) : साहित्य : संस्कृती, समाज व माध्यमांतर
UGC Approved Journal
ISSN : 2348-7143
January-2019

प्रभावाखाली आलेले दिसत नाही. मात्र त्यांच्या सामाजिक जाणिवा प्रगल्भ असल्याने नकळत त्या प्रवृत्ती त्यांच्या कवितांमधून डोकावतात. वसंत बापटांची कविता सामाजिक जाणिवा व जीवनमूल्यांना उपरोध उदात्तभावाने व्यक्त करते.

वसंत बापट व मंगेश पाडगावकर यांच्या कवितेबद्दल केशव शिरवाडकर म्हणतात,

''जीवनाचे आदीम सौंदर्य प्रचलित समाजरचनेत त्यावर आलेले मालिन्य, नैतिक मूल्यांचा ऱ्हास आणि माणुसकीचा अध:परत ह्याबद्दलच्या उत्कट प्रतिक्रिया त्यांच्या कवितेत दिसतात. सामाजिक दांभिकता उपहास गर्भ शब्दांत पाडगावकर उघडी करतात.. पण त्यामागे 'बुडते हे जन' च्या मागे असणारे काव्यप्रयोजन नसते त्यामागे वेगळीच रंजनसूत्रे असतात. खोट्या प्रयोगशीलतेमुळे त्यांच्या विचारात अनुभवता, चिंतनशीलता प्रत्ययास येत नाही.''[१६]

नवकवितेच्या या कालखंडामध्ये वरील कवींच्या काव्य प्रवृत्तींचा विचार करत असताना अन्य कवींच्या काव्य प्रवृत्तींचा विचार करता पाश्चात्य साहित्य संप्रदाय व आंग्ल काव्य यांचा प्रभाव, यंत्र युगाची परिणती, सामाजिक विषमतेचे चित्रण, विडंबन, बुध्दीनिष्ठता, जीवनातील नैराश्य, वैफल्याचे चित्रण, भावनानिष्ठ समतानता व तंत्रनिष्ठ प्रयोगशीलता इत्यादी प्रवृत्तींतून समाजवास्तव्य चित्रित केलेले दिसते.

१९६० ते १९९० कालखंड

मराठी नवकवितेचा दुसरा टप्पा १९६० पासून सुरुहोतो. साठोत्तरी मराठी कविता गवताऐसी उदंड झाली. या दरम्यान मराठी कवितेमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून आले. अनेक नव्या जाणिवा, नव्या संवेदना जागृत झाल्या. काही नव्या प्रवृत्ती उदयास आल्या. मराठी कवितेत यापूर्वी केशवसुत व मर्ढेकर यांनी आपल्या कवितांच्या सामर्थ्यांवर वेगवेगळी युगं निर्माण केली. मात्र १९६० नंतरचा कालखंड कुठल्याही एका विशिष्ट कवीच्या नावाने ओळखला जात नाही तर तो 'साठोत्तरी मराठी कविता' म्हणून ओळखला जातो. निशिकांत ठकार म्हणतात, ''लघुनियतकालिकांमुळे एक प्रकारचे अराजक निर्माण झाले व कवितेसंबंधीची काव्य समीक्षेसंबंधीची, मूल्ये उद्ध्वस्त झाली. विद्रोहाचे अनेक सूर उमटले. या संतप्त पिढीचा विद्रोह पुढे सामाजिक बांधिलकी मानणाऱ्या मार्क्सवादी व दलित काव्य प्रवाहात नियमित झाला.''[१७] या लघुनियतकालिकातील प्रेरणाभूत ठरणाऱ्या राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरील परिस्थितीची घसरण झाल्याचे दिसून येते.

१९५५ ते १९६५ या कालखंडात भारताचा आंतरराष्ट्रीय राजकारणात प्रवेश, संयुक्त महाराष्ट्र लढा, भारत-चीन व भारत पाकिस्तान युद्ध इत्यादी घटनांचा प्रभाव कवितेवर देखील झाला. तो प्रभाव पडणे अपरिहार्यच होतो. एकूणच १९५० नंतरच्या कालखंडाबद्दल अक्षयकुमार काळे म्हणतात. '' या कालखंडात प्रत्येक क्षेत्रात आदर्श आणि वास्तव यांच्यामध्ये दरी निर्माण झाली व ती पुढे-पुढे रुंदावतच गेली. अपवादभूत आदर्श विशिष्ट व्यक्तिबरोबर निर्माण झाले. व त्या व्यक्तिबरोबरच वावरले व त्या व्यक्तिबरोबरच संपुष्टात आले. सर्वसामान्य जनजीवनाच्या प्रवृत्तीत बदल होऊन आदर्शांचे संपूर्ण सामाजिककरण होण्याची प्रक्रिया नाहिशी झाली.''[१८] नारायण सुर्वे यांच्या उदयापर्यंत शाहीर अण्णाभाऊ साठे, शाहीर अमरशेख वगैरेंची जोशपूर्ण, लोकनिष्ठ व उघडपणे प्रचारकी असलेली शाहिरी आपले जीवनकार्य पार पाडीत होती. त्यांच्या निष्ठा खोट्या नव्हत्या. पण राजकीय बांधिलकीमुळे मळवाट ठरलेली होती. साम्यवादावरच्या प्रखरनिष्ठेने अमरशेखांचे अवघे व्यक्तित्व फुलून ठरलेली होती. कवी किंवा शाहिरीला अमरशेख समकालीन युग प्रवृत्तीचा प्रवक्ता मानतात. समाजवाद हा युगधर्म असून शाहीर वा कवी त्याचा वाहक असतो. या अभिमानी व नि:संदिग्ध वृत्तीतून त्यांच्यी काव्यनिर्मिती झालेली दिसते. क्रांतीचे तत्त्वज्ञान जनसामन्यांत पेरण्यासाठी आगीचा लोळ लोकांच्या मनात

ISSN : 2348-7143
January-2019

उतरविण्याकरता ते कृतिशील होतात. त्यांच्या कवितांमधून मानवतावादी वृत्ती, राष्ट्रप्रेम, प्रेमातील उदात्तता, साम्यवादी वृत्ती, शोषणमुक्त समाजनिर्मिती, जग बदलण्याची महत्त्वकांक्षा, वर्गविहीन भारत निर्मितीचा स्वप्नाभाव आदी वृत्तीचे दर्शन घडते.

'जे जाणवले काळजात सलले तेच शब्दरुप घेऊन बाहेर पडले' असे सुर्वे यांनी म्हटले आहे. ''सुर्वेच्या कवितेतील या सगळ्या आशयगाभ्याचे आकलन मार्क्सवादी विचारातून जन्मास आले असले तरी ते तिथेच थांबत नाही. अर्थाच्याही पलिकडे असणाऱ्या मानवाच्या चिरंतन सुखदुःख प्रवासाची व जीवनातील हेतुपूर्णतेची त्यांना जाणीव आहे.''[१९] भाकरीच्या समस्येच्या पलीकडे खूप गोष्टी आहेत त्याची कवीला आस आहे. एकूणच सुर्वे यांची कविता आशावादी, सबळ श्रद्धावादी, इहनिष्ठवादी, वास्तवाभिमुख, मानवतावादी, साम्यवादी, संघर्षवादी, विद्रोह, नकार इत्यादी प्रवृत्तींचे दर्शन घडवित स्वतःच्या वेगळेपणाची ओळख निर्माण करते.

संघटित श्रमशक्ती आणि विज्ञानावर अतोनात निष्ठा ठेवणारे बाबा आमटे भूमिपुत्रांच्या वेदनांशी समरस होताना दिसतात. शेतमजुरांप्रमाणेच गिरणीच्या धुराने काळवंडून इतरांना तलम वस्त्रे पुरविणारा कामगार त्यांच्या कवितेत पाहावयास मिळतो. जीवनविषयक मूल्यनिष्ठा, श्रमनिष्ठा, साम्यनिष्ठा, साम्यवाद, पुरोगामित्त्वांवरील श्रध्दा, वर्तमानबद्दल अमर्याद प्रेम, पारंपारिक विषयांचा वेध इत्यादी प्रवृत्तींचे प्रत्यंतर त्यांच्या कवितेत जाणवते.

जगातील विषमता, श्रमनिष्ठा, भांडवलशाहीला विरोध, क्रांतिकारकता, ऐक्यभाव, मानवतावाद इत्यादी वृत्तींतून रॉक कॉर्व्हालो यांची मार्क्सवादावरील निष्ठा स्पष्ट होते.

नारायण सुर्वेनी मळलेल्या वाटेवर आपली पावले टाकीत गिरणी कामगार शिवराम देवलकर मार्गक्रमण करताना दिसतात. मार्क्स आणि लेनिन यांच्यावरील श्रद्धा, गिरणगावाबद्दलची आस्था, दारिद्र्याबद्दलची आत्मीयता, आव्हानात्मक प्रवृत्ती त्यांच्या कवितेत प्रत्ययास येतात.

भांडवलशाही विकास व शोषितांची परवड यांचे प्रभावी चित्रण वामन इंगळे यांच्या कवितेतून येते. सामाजिक दंभाला विरोध, नववास्तवाचे दर्शन, संज्ञा प्रवाह, संत अंभगाचा प्रभाव इत्यादी वृत्ती विशेषांचा त्यांच्या काव्यातून प्रभाव जाणवतो. साम्यवाद निष्ठा जपणारे सुरेश नगर्सेकर शोषणमुक्त जीवनाचा मळा खउलवण्याचे स्वप्न पाहतात. यंत्रनिष्ठा, विषमतेविषयीची चीड, प्रचारात्मकता, नाट्यपूर्णता व संघर्षमयता यांचा अनुभव त्यांची कविता देते.

भावनिक आकलन व मार्क्सवादी चिंतन हा राजा राजवाडे यांच्या कवितेचा स्थायीभाव आहे. मानवतावाद, दलितांबद्दलचा कळवळा, शहिदांवरील निष्ठा व आंतरराष्ट्रीय स्थितीगतीचे भान त्यांच्या कवितेतून स्पष्टपणे जाणवते. एकूणच सुर्वेच्या नेतृत्त्वाखाली रॉक कॉर्व्हालो, सुरेश नगर्सेकर, शिवराम देवलकर, राजा राजवाडे इत्यादी कवींनी साम्यवादी तत्वांची अढळ असलेली कविता लिहिली.

मराठी काव्यनिर्मितीचे सगळे संकेत धुडकावून लावणारे साठोत्तरी दलित साहित्य प्रवाहातील एक वजनदार कवी नामदेव ढसाळ होय. डॉ. अक्षयकुमार काळे म्हणतात, ''तीव्र समूहनिष्ठा मनात बाळगणाऱ्या या कवीची समग्र कविता व्यक्तीचे आणि समूहाचे चित्रण कमालीच्या व्यक्तिनिष्ठ पध्दतीने करते त्यामुळेच समग्र मराठी कवितेत सर्व बंधनांना पार करणारी स्वतंत्र ओळख तिला प्राप्त झाली आहे. वर्णविषमतेबरोबरच वर्गविषमतेची तीव्र जाणीव त्यांच्या कवितेतून व्यक्त होते.''[२०] सामाजिक विषमतेचे दर्शन, वर्गीय जीवननिष्ठांशी एकरुप असणे, सर्वहारा वर्गाबद्दल आस्था परिवर्तनाची आस आदी वृत्तींचे दर्शन त्यांच्या काव्यातून होते.

केशव मेश्राम यांच्या कवितांमधून व्यापक विचार विश्वाला सामोरे जाणे, वैयक्तिक आणि सामाजिक चेतनेचा अंतःस्तर पाहाणे, दलित आणि दलितेतरांच्या व्यापक रसिकतेला संयतवृत्तीने आवाहान केलेले दिसते.